# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२२

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थीनी आणि कर्मचाऱ्यांसाठी विशेष कक्ष स्थापन करण्याबाबत

**(१) ५२८ (१८-०३-२०२०) ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) युनायटेड ग्रँड कमिशन यांनी सन २०१५ मध्ये देशभरातील शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांसाठी आखून दिलेल्या नियमांच्या अखत्यारिमध्ये विशेष कक्ष स्थापन करण्याचे निर्देश दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयानुसार देशभरातील विद्यापीठ आणि महाविद्यालयामध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनींची सुरक्षा लक्षात घेता त्यांच्यासाठी विशेष कक्ष स्थापन करण्याची सूचना युजीसीने दिली असून मुंबई विद्यापीठांतर्गत येणाऱ्या किती व कोणत्या महाविद्यालयामध्ये उपरोक्त विशेष कक्ष स्थापन करण्यात आले आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (२४-११-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मुंबई विद्यापीठातील १८३ महाविद्यालयांत महिला विकास कक्ष (WOMEN DEVELOPMENT CELL) स्थापन करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### ताळेबंदीच्या काळात मुंबईसह राज्यातील स्वस्त धान्य दुकानदार अन्नधान्याचा अपहार करीत असल्याबाबत

**(२) ४५७३ (१५-०७-२०२०) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यातील अंत्योदय आणि प्राधान्य गटातील कुटुंबांसाठी संकेतस्थळावर नमूद केल्याप्रमाणे अन्न व नागरी पुरवठा विभागाकडून अल्पदरात धान्य वितरित करणे बंधनकारक असताना, तसेच केंद्र शासनाच्या योजनेनुसार शिधापत्रिकेवरील प्रत्येक सदस्यांना पाच किलो तांदूळ देणे बंधनकारक असतानाही, कोरोनाच्या प्रार्द्रभावामुळे लॉकडाऊनच्या काळात मात्र, राज्यातील मुंबई (वरळी,अंधेरी व अन्य भाग) नवीमुंबई, पुणे, ठाणे, सातारा, रायगड, गुहागर (रत्नागिरी), सिंधुदुर्ग, व अन्य जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानदारांकडून अपहार केला जात असून प्रत्यक्ष कोटयापेक्षा कमी अन्नधान्य देणे, अधिकचा दर आकारणे, खाण्यास अयोग्य असलेल्या प्रकारचे अन्नधान्य वितरित करणे अशा असंख्य घटना निदर्शनास आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहु प्रकरणाबाबत शासनाकडे अनेक तक्रारी प्राप्त झाल्या असतानाही संबंधित दोषींविरुध्द कारवाई करण्यास शासनाकडून दिरंगाई होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वरळी येथील पांडुरंग बुधकर मार्गावरील श्रीमहालक्ष्मी को.ऑ.हौसिंग सोसायटी येथील तळमजल्यावरील स्वस्त धान्य दुकान (क्र.२०-क्र.६५) येथे दिनांक ०६ मे, २०२० रोजी वा दरम्यान मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधान परिषद यांनी स्वस्त धान्य विभागाचे अधिकारी, पोलीस यांचेसह प्रत्यक्ष छापा टाकून स्वस्त धान्य दुकानातून निकृष्ट दर्जाचा गहू, तांदूळ वितरीत होत असल्याचे निदर्शनास आणून दिले असून मागील काही महिन्यांपासून असेच निकृष्ट दर्जाचे धान्य शासनाकडून वितरीत होत असल्याची कबुली दुकानदाराने दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, स्थलांतरीत मजुर, भटके मजुर आदींकडे शिधापत्रिका नसल्याने लॉकडाऊन काळात त्यांचे प्रचंड हाल होत असल्यामुळे शासनाने शिधापत्रिकांची अट न घालता सर्वांना अन्नधान्य वितरीत करावे, तसेच जनतेच्या अन्नधान्याचा अपहार व गैरव्यवहार करणाऱ्या दुकानदारांवर विनाविलंब कार्यवाही करावी, अशा आशयाची मागणी मा.अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री, प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे अन्न अधिकार अभियानाच्या नियंत्रक सदस्य यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अन्नधान्याचा अपहार, गैरव्यवहार तसेच अन्यप्रकारच्या प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित दोषींविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण (०१-११-२०२२) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

मुंबई/ठाणे, पुणे शिधावाटप क्षेत्रात अशा प्रकारच्या घटना आढळून आल्या नाहीत. पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा, पुणे ग्रामीण, नागपूर शहर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, लातूर, हिंगोली, अमरावती, नाशिक, जळगांव, धुळे, नंदुरबार या ठिकाणी धान्य वितरणाबाबत तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्या अनुषंगाने संबंधित रास्तभाव दुकानदारांवर कार्यवाही करण्यात आली आहे. तथापि, खाण्यास अयोग्य असलेल्या अन्नधान्याचे वितरण करण्यात आल्याचे निदर्शनास आले नाही.
(२) हे खरे नाही.

लॉकडाऊनच्या कालावधीत प्राप्त तक्रींच्या अनुषंगाने संबंधित रास्तभाव/शिधावाटप दुकानदारांविरुध्द नियमानुसार कारवाई करण्यात आली आहे.

(३) संबंधित दुकानांमध्ये आवक झालेल्या २४ गोण्यांमधील गव्हाच्या ४ गोण्यात काडी-कचरा असल्याचे निदर्शनास आल्यानंतर सदरचा गहू गोदामामध्ये बदलून घेण्यात आला आहे. तसेच, या गव्हाचे नमूने जिल्हा सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, कोकण भवन यांच्याकडून तपासून घेण्यात आला असून हा गहू FS & S (FPS & FA) Regulation, २०११ नुसार सुरक्षित व प्रमाणित दर्जाचा असल्याचा प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त झाला आहे.

(४) हे खरे नाही.

याबाबत कोणतेही लेखी निवेदन अन्न अधिकार अभियानाच्या नियंत्रक सदस्य यांचेकडून अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झालेले नाही.

मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्र तसेच पुणे, पालघर, रायगड, नागपूर, भंडारा, गोंदिया या जिल्ह्यांमध्ये आत्मनिर्भर भारत योजनेंतर्गत शिधापत्रिका नसलेल्या स्थलांतरीत मजुर, भटके मजूर यांना माहे मे व जून, २०२० मध्ये मोफत तांदूळ व चणा यांचे वाटप करण्यात आले आहे.

(५) अन्नधान्याचा अपहार, गैरव्यवहार करणाऱ्या रास्तभाव दुकानदारांवर जीवनावश्यक वस्तु अधिनियम १९५५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात येतो किंवा त्या दुकानदाराचे प्राधिकारपत्र निलंबित अथवा रद्द करण्यात येते. यासंदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

रायगड जिल्ह्यात ३ रास्तभाव दुकाने रद्द करण्यात आली असून व १२ दुकानांची १०० टक्के अनामत रक्कम जप्त करण्यात आली.

रत्नागिरी जिल्ह्यात ५ रास्तभाव दुकानदारांवर गुन्हा दाखल करून दुकानाचे परवाने रद्द करण्यात आले आहेत, तसेच १ रास्तभाव दुकान रद्द करण्यात आले असून १ परवाना निलंबित व ७ दुकानदारांवर रुपये २,३१,९६१/- इतकी दंडात्मक कारवाई करून त्यापैकी रुपये ६४,७४७/- रक्कम वसूल करण्यात आली.

ठाणे जिल्ह्यात शहापूर तालुक्यात १ भिंवडी तालुक्यात ५ व मुरबाड तालुक्यात २ अशा एकूण ८ दुकानांवर कारवाई करुन परवाना रद्द करण्यात आला आहे.

पालघर जिल्ह्यात १३ दुकानदारांचे निलंबन, ८ दुकानदारांची १००% अनामत रक्कम जप्त, ८ दुकानांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

तसेच नियंत्रक शिधावाटप, मुंबई यांनी १५ रास्तभाव दुकाने निलंबित, ५ दुकाने रद्द व १४ दुकानदारांवर गुन्हे दाखल केले आहेत.

सातारा जिल्ह्यात १६ दुकानांचे परवाने रद्द, ७ दुकाने निलंबित, १० दुकानांची अनामत रक्कम जप्त करण्यात आली. ३ दुकानांना रुपये १५०००/- इतका दंड आकारण्यात आला तसेच ८ दुकानांच्या धान्याच्या साठ्यामध्ये तफावत आढळून आल्याने त्यांच्याकडून रुपये १,२५,३५६/- इतका दंड वसूल करण्यात आला.

पुणे जिलह्यात १६ रास्तभाव दुकानांची अनामत रक्कम जप्त, १६ दुकानांची परवाने रद्द, १६ दुकानांचे परवाने निलंबित, ६ रास्तभाव दुकानांविरूध्द दंडात्मक कारवाई, १० रास्तभाव दुकानदारांकडून धान्य तफावतीची नुकसान भरपाई वसूल करण्यात आली तसेच ३ परवानाधारकांना सक्त ताकीद देण्यात आली.

गोदिया जिल्ह्यात १५ रास्तभाव दुकानांची अनामत रक्कम जप्त करण्यात आली. तसेच २ दुकानदारांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

लातूर जिलह्यात ३ दुकानदारांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच त्यांच्याकडून रुपये १,५०,०००/- एवढया किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

हिंगोली जिल्ह्यात ७ दुकानदारांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांच्याकडून रुपये २,४२,५००/- एवढया किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

अमरावती जिल्ह्यात २ रास्तभाव दुकानदारांचे प्राधिकार पत्र रद्द करण्यात आले. तसेच २ दुकानांची अनामत रक्कम जप्त करण्यात आली.

अकोला जिल्ह्यात ६ रास्तभाव दुकाने रद्द, १४ दुकानांचे परवाने निलंबित करण्यात आले. तसेच ४ दुकानांची अनामत रक्कम जमा करण्यात आली.

यवतमाळ जिल्ह्यात ८ रास्तभाव दुकानांचे परवाने रद्द, १७ परवाने निलंबित, १५ रास्तभाव दुकानदारांना सक्त ताकीद देण्यात आली.

बुलढाणा जिल्ह्यात ७ रास्तभाव दुकानांची परवाने रद्द, ५ परवाने निलंबित करण्यात आले.

वाशिम जिल्ह्यात १३ रास्तभाव दुकानांच्या परवाना रद्द, ४ दुकानांचे परवाने निलंबित तसेच १० रास्तभाव दुकानांची अनामत रक्कम जमा करण्यात आली.

नाशिक जिल्यात १७ रास्तभाव दुकानांचे परवाने रद्द, १२ परवाने निलंबित करण्यात आले. तसेच १९ रास्तभाव दुकानांची अनामत रक्कम जमा करण्यात आली.

जळगांव जिल्ह्यात १५ रास्तभाव दुकानांचे परवाने रद्द, १३ दुकानांचे परवाने निलंबित करण्यात आले. तसेच १६ रास्तभाव दुकानांची अनामत रक्कम जमा करण्यात आली, ५ रास्तभाव दुकानदारांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

धुळे जिल्ह्यात ५ दुकानांचे परवाने रद्द, १० दुकानांचे परवाने निलंबित, १३ रास्तभाव दुकानांची अनामत रक्कम जमा करण्यात आली. तसेच ३ रास्तभाव दुकानदारांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

नंदुरबार जिल्ह्यात २८ रास्तभाव दुकानदाराविरुध्द परवाना रद्द, निलंबित तसेच दंडाची कारवाई करण्यात आली. तसेच ६ रास्तभाव दुकानदारांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

---

## उमरी, नांदेड शहर, लोहा व उस्माननगर (जि.नांदेड) परिसरातील चोरीचे प्रमाण रोखण्याबाबत

**(३) ९८०० (२२-०६-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड : तारांकित प्रश्न क्रमांक ६७१४ ला दिनांक २ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरी (जि.नांदेड) येथील श्री.संदीप पाटील यांचे किराणा मालाचे दुकान फोडून मालाची चोरी केल्याची घटना दिनांक २६ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास घडली असून नांदेड शहर, लोहा व उस्माननगर परिसरात चोरी व लुटमारीच्या घटनांमुळे नागरिक त्रस्त झाल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चोरी करणाऱ्या आरोपीस अटक करुन परिसरातील वाढत्या चोरी, लुटमार, घरफोडी व दुकानफोडी रोखण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१४-११-२०२२) :** (१) उमरी (जि.नांदेड) येथे किराणा मालाचे दुकान फोडून मालाची चोरी केल्याची घटना घडल्याबाबत दिनांक २६ मे २०२१ रोजी वा त्यासुमारास पोलीस स्टेशन उमरी येथे तक्रार व त्यानुषंगाने गुन्हा दाखल नाही.

तथापि, माहे मे २०२१ मध्ये पोलीस स्टेशन उस्माननगर व लोहा पोलीस स्टेशन येथे प्रत्येकी ०२ जबरी चोरीचे व नांदेड शहर पोलीस स्टेशनमध्ये ०४ जबरी चोरीचे गुन्हे दाखल आहेत.

(२) उस्माननगर मधील दोन जबरी चोरींच्या दाखल गुन्ह्यांपैकी एका गुन्ह्यात आरोपीस अटक करण्यात आली असून दिनांक २८/०७/२०२१ रोजी मा.न्यायालयामध्ये दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. दुसऱ्या गुन्ह्यामध्ये पुढील तपास सुरु आहे.

लोहा पोलीस स्टेशन येथील दाखल दोन्ही जबरी चोरीचे गुन्हे निदर्शनास आले असून मा.न्यायालयामध्ये दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहेत.

नांदेड शहर पोलीस स्टेशनमधील ०४ जबरी चोरीच्या गुन्ह्यांपैकी ०३ गुन्हे निदर्शनास आले आहेत.

नांदेड जिल्ह्यातील मालमत्ता संबंधातील गुन्ह्यांमध्ये सक्रिय गुन्हेगारांना प्रतिबंध करण्यासंदर्भात नियमित नाईट पेट्रोलिंग, नाकाबंदी, ऑल आऊट ऑपरेशन राबवून कारवाई करण्यात येत आहे.

नांदेड (ग्रामीण) हद्दीतील ०६ पोलीस स्टेशनमध्ये २४ तास पेट्रोलिंग करण्याकरीता बीट मार्शल्स नेमण्यात आले आहेत. तसेच नांदेड शहरातही पेट्रोलिंग सुरु आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

## देशात आणि राज्यात शिक्षण व्यवस्थेत खाजगीकरणाला प्राधान्य दिले जात असल्याबाबत

**(४) १०२५२ (०२-१०-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशात तसेच राज्यात शिक्षण व्यवस्थेच्या खाजगीकरणामुळे गरिब विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार असल्याने याबाबत शासनाने वेळीच धोरण न बदलल्यास शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक विषमतेत वाढ होणार असल्याचे माहे मार्च, २०२१ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षण हे राष्ट्र निर्मितीच्या उभारणीचे प्रमुख साधन असल्याने त्यासाठी सन १९६२ मध्ये शिक्षणाबाबत विचार मांडण्यासाठी नेमलेल्या कोठारी आयोगाने एकूण ६ टक्के उत्पन्नातील रक्कम खर्च करण्याबाबत केलेल्या शिफारशीची अंमलबजावणी अद्यापपर्यंत करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खाजगी क्षेत्रात शेकडो विद्यापीठांना मान्यता देण्यात येत असताना शासकीय विद्यापीठांचा दर्जा सुधारण्यासाठी निधी दिला जात नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन खाजगी व शासकीय विद्यापीठातील समान धोरण ठरवून शिक्षणासाठी निधी खर्च करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (१६-११-२०२२) :** (१) हे खरे नाही.

शासनाच्या विविध योजनांद्वारे सर्व प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षण उपलब्ध होईल यासाठी योजना कार्यान्वित आहेत.

(२) हे खरे नाही.

आवश्यकतेनुसार तरतूद उपलब्ध करून देण्यात येते.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद (मराठवाडा) सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभागांतर्गत कामे निकृष्ट दर्जाची करुन कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याबाबत

**(५) १३२१० (३०-०३-२०२२) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद (मराठवाडा) सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभागांतर्गत निकृष्ट दर्जाची कामे करुन कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभागांतर्गत सन २०१६ या मध्ये झालेल्या निकृष्ट दर्जाच्या कामांबाबत विभागाकडे तक्रारी प्राप्त झाल्या होत्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामांची गुणवत्ता व दक्षता विभागाकडून सुरु असलेली चौकशीची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय, तसेच चौकशी अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन निकृष्ट दर्जाची कामे करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण (२५-११-२०२२) :** (१), (२), (३) व (४) सन २०१६ वर्षामध्ये निकृष्ट दर्जाचे काम झाले अशा स्वरुपाच्या विविध तक्रारी प्राप्त झाल्या होत्या, अशा स्वरुपाच्या तक्रारी वेळोवेळी आल्यानंतर सदर तक्रारींच्या अनुषंगाने दक्षता व गुण नियंत्रण मंडळामार्फत चौकशी करण्यात येत असते सन २०१६ मध्ये ७२ प्रकरणांपैकी दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांचेकडून ३८ प्रकरणांची चौकशी करुन अहवाल सादर करण्यात आले आहेत.

उर्वरित ३४ प्रकरणांवर चौकशी प्रगतीत आहे. ३८ प्रकरणांपैकी एका प्रकरणात अनियमितता आढळून आल्याने दोषारोप बजाविण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पात्रताधारक सहाय्यक प्राध्यापक ते कुलगुरू यांची नियुक्ती महाराष्ट्र अधिनिवास प्रमाणपत्राद्वारे (Domicile) करण्याबाबत

**(६) १३५३६ (३०-०३-२०२२) श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या शिफारसीनुसार गुणवत्तेच्या आधारावर महाराष्ट्र शासनाच्या सर्व विभागातील विविध मंजूर पदावर नेमणुकीसाठी उमेदवाराचे अधिवास क्षेत्र महाराष्ट्र राज्य असणे अनिवार्य असल्याने पात्रताधारक सहाय्यक प्राध्यापक ते कुलगुरू यांची नियुक्ती महाराष्ट्र अधिनिवास प्रमाणपत्राद्वारे (Domicile) करण्याबाबतची मागणी महाराष्ट्र प्राध्यापक सेनेने मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री महोदयांकडे दिनांक २८ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास वा तत्पूर्वी लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने पात्रताधारक सहाय्यक प्राध्यापक ते कुलगुरू यांची नियुक्ती महाराष्ट्र अधिनिवास प्रमाणपत्राद्वारे (Domicile) करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (१४-११-२०२२) :** (१) प्रश्नात नमूद आशयाचे निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(२) विद्यापीठ अनुदान आयोगाने वेळोवेळी प्रसिध्द केलेले शैक्षणिक अर्हतेचे नियम हे संपूर्ण देशात लागू असल्याने, शिक्षकीय पदांसाठी/ कुलगुरु पदांसाठी राज्याबाहेरचे उमेदवार शैक्षणिक अर्हता धारण करीत असल्यास अर्ज करण्यास तसेच नियुक्तीसाठी पात्र ठरतात. त्यामुळे शिक्षकीय तसेच कुलगुरु पदांसाठी राज्याबाहेरील उमेदवारही शैक्षणिक अर्हता धारण करीत असल्यास संबंधित उमेदवारांना महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र अनिवार्य नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शासकीय व खाजगी रुग्णालयांमध्ये अग्निपरिक्षण करुन अग्निसुरक्षा यंत्रणा बसविण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(७) १३५८९ (२५-०४-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिनस्त असलेल्या शासकीय व खाजगी रूग्णालयात आग लागण्याच्या दुर्घटनामुळे सन २०२०-२१ मध्ये ७६ लोकांचा मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शासकीय व खाजगी रुग्णालयांमध्ये अग्निपरिक्षण करुन अग्निसुरक्षा यंत्रणा बसविण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने शासनाकडे रुपये २३० कोटी निधीची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिनस्त असलेल्या शासकीय व खाजगी रुग्णालयामध्ये अग्निसुरक्षा यंत्रणा बसविण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१५-११-२०२२) :** (१) सन २०२०-२१ आणि सन २०२१-२२ मध्ये सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारीत असणाऱ्या रुग्णालयातील नवजात शिशु कक्ष आणि कोविड अतिदक्षता विभागात लागलेल्या आगीमध्ये २४ रुग्णांचा मृत्यू झाला. तसेच, उपलब्ध माहितीच्या आधारे सन २०२१-२०२२ मध्ये काही खाजगी रुग्णालये सनराईज हॉस्पीटल, भांडुप, मुंबई विजय वल्लभ रुग्णालय, विरार आणि प्राईम क्रिटीकेअर रुग्णालय, मुंब्रा, ठाणे येथे आगीच्या घटना घडल्या. सदर घटनांमध्ये एकूण ३० मृत्युंची नोंद आहे.
(२) अंशत: हे खरे आहे.
(३) राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारीत असणाऱ्या रुग्णलयांमध्ये अग्निसुरक्षा यंत्रणा बसविण्यासाठी एकून रुपये १२५,५९,१६,१५४/- इतक्या किंमतीचे प्रस्ताव शासनास प्राप्त झाले असून त्यापैकी रुपये ९४,४५,९८,०००/- किमतींच्या अंदाजपत्रक व आराखड्यास प्रशासकीय मान्यता दिली आहे. राज्यातील आरोग्य संस्थांना अग्निशमन यंत्रणा उभारण्यासाठी जिल्हा नियोजन समीतीकडून रुपये ९१,७९,९०,८०६/- एवढा निधीची मान्यता प्राप्त झाली असून त्यामध्ये अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठीचे काम प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर तालुक्यातील ग्रामपंचायतीमध्ये कार्यरत संगणक परिचालकांचे मानधन अदा करणेबाबत

**(८) १३६०१ (०१-०६-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर (जि.नागपूर) तालुक्यातील विविध ग्रामपंचायतीमध्ये कार्यरत असलेल्या सुमारे ५६ संगणक परिचालकांचे दरमहा मिळणारे मानधन गेल्या दोन ते तीन महिन्यांपासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर संगणक परिचालकांचे मानधन नियमित न मिळण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर संगणक परिचालकांचे थकीत मानधन अदा करणेबाबत व पुढील मानधन नियमित मिळणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (२९-११-२०२२) :** (१) हे खरे नाही.

सदर संगणक परिचालकांचे माहे सप्टेंबर, २०२२ पर्यंतचे मानधन अदा करण्यात आलेले आहे.

(२) व (३) आपले सरकार सेवा केंद्रात कार्यरत संगणक चालकांचे मानधन देणेकरीता ग्रामपंचायतीकडून अदा करण्यात येणाऱ्या देयकांबाबत देयक संगणक प्रणाली तयार करण्यात आली असून, सदर प्रकल्प राबविणे करीता निश्चित करण्यात आलेली रक्कम प्रत्येक ग्रामपंचायत जिल्हा स्तरीय निधीला वर्ग करते व तो निधी RGSA खात्यात जमा होऊन त्यातूनच संगणक परिचालकांचे मानधन CSC-SPV या कंपनीमार्फत संगणक परिचालकांच्या कामगिरीनुसार दरमहा अदा करण्यात येते.

बहुतांश वेळा ग्रामपंचायती जिल्हा स्तरीय निधीला वर्ग करावयाची आगाऊ रक्कम वेळेवर जमा करत नसल्याने संगणक परिचालकांचे मानधन नियमित करणे शक्य होत नाही.

ग्रामपंचायतींकडून सदर आगाऊ रक्कम जमा करून घेण्यासाठी शासनाकडून वेळोवेळी जिल्हा परिषदांना सूचना देण्यात येतात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात ग्रामीण भागातील रस्ते प्रमुख रस्त्यांशी जोडण्याकरीता पंतप्रधान ग्रामसडक योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत

**(९) १३६११ (२९-०४-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०२१-२२ या वर्षात पंतप्रधान ग्रामसडक योजनेंतर्गत ग्रामीण भागातील रस्ते प्रमुख रस्त्यांशी जोडण्याकरीता १४०० कि.मी. रस्ते बांधणीचे उद्दीष्ठ ठरविण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत राज्यातील दिनांक ४ फेब्रुवारी, २०२२ पर्यंत २५७ कि.मी. (१८ टक्के) चे काम पूर्ण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने पंतप्रधान ग्रामसडक योजनेंतर्गत सर्व मार्गदर्शक तत्वांचे पालन करुन राज्यात ग्रामसडक योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करुन ग्रामीण भागातील रस्ते प्रमुख रस्त्यांशी जोडण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (२१-१२-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे. प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत ग्रामीण भागातील रस्ते प्रमुख रस्त्यांशी जोडण्याकरीता १००० कि.मी.चे उद्दिष्ट ठरविण्यात आले होते.

(२) सदर योजनेंतर्गत मार्च,२०२२ अखेर १९९.९६ कि.मी.लांबीची कामे पूर्ण झाली आहेत.

(३) व (४) सदर योजनेंतर्गतची कामे तीन टप्प्यामध्ये मंजूर झालेली आहेत. ती खालीलप्रमाणे,

| दिनांक | कामे | लांबी | किंमत कोटी |
|---|---|---|---|
| ३१/०३/२०२१ | ३८० | २५८१.७२ | १९१९.७६ |
| २४/०५/२०२१ | ३४ | २२७.६५ | १७२.६१ |
| ०४/१०/२०२१ | १६ | ११६.५५ | ८५.०९ |
| | ४३० | २९२५.९२ | २१७७.४६ |

सदर कामांना केंद्रशासनाच्या मान्यतेनंतर राज्य शासनाची तांत्रिक मान्यता/ प्रशासकीय मान्यता घेण्यात आली. तद्नंतर निविदा प्रक्रिया करण्यात आली. सदर प्रक्रिये दरम्यान कोविड-१९ महामारीच्या प्रार्दुभावामुळे मंजूर केलेल्या कामांना गती घेण्यात विलंब झाला आहे.

मंजूरी देण्यात आलेली कामे पूर्ण करण्यासाठी साधारणत: १२ ते १८ महिन्यांचा कालावधी लागतो त्यामूळे या वर्षाअखेर कामे अंतिम टप्प्यात येणार आहेत. व त्यानुसार नियोजन करण्यात आलेले आहे.

---

## कामगार विमा योजनेच्या अंशदानाची मर्यादा वाढविणेबाबत

**(१०) १३६१९ (२९-०४-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन १९५४ मध्ये नोंदणीकृत कामगार व त्यांच्या कुटुंबियांस वैद्यकीय लाभ मिळणेकरीता कामगार विमा योजना सुरू करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेच्या नियमानुसार अंशदान राशी रुपये २१ हजार तसेच २५ हजार रुपये वेतन असलेले कामगार या योजनेसाठी पात्र ठरतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कामगार विमा योजनेमध्ये अंशदान राशीची मर्यादा रुपये ३० हजार पर्यंत वाढवून मिळण्याबाबतची मागणी विविध कामगार संघटनांनी केली आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने कामगार संघटनांनी केलेल्या मागणीनुसार कामगार विमा योजनेद्वारे अंशदान राशीची मर्यादा रुपये ३० हजार पर्यंत वाढवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१६-११-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

केंद्र शासनाच्या "राज्य कामगार विमा अधिनियम १९४८" अन्वये श्रम व रोजगार मंत्रालय, भारत सरकार यांच्या अधिपत्याखालील राज्य कामगार विमा महामंडळ, नवी दिल्ली यांच्या मार्फत "राज्य कामगार विमा योजना" राबविली जात असून सदर योजने अतंर्गत नोंदणीकृत विमाधारक व लाभार्थींना राज्य शासनामार्फत वैद्यकीय सेवा पुरविण्यात येते.

(२) होय, हे खरे आहे.

ज्या कंपनीमध्ये १० किंवा त्यापेक्षा जास्त कामगार काम करतात व ज्या कामगारांचे मासिक उत्पन्न रुपये २१,००० पेक्षा कमी आहे (अपंग कामगारांसाठी रुपये २५,०००) अशा कामगारांना राज्य कामगार विमा योजना लागू असून प्रती कामगार प्रती महिना कामगारांच्या वेतनाचे एकूण ४.००% वर्गणी जमा करण्यात येत असून त्यामध्ये ०.७५% कामगारांकडून व ३.२५% मालकाकडून असा वर्गणीचा समावेश आहे. सदर वर्गणी थेट राज्य कामगार विमा महामंडळाकडे जमा होत असून शासनाकडे जमा होत नाही.

(३) होय, हे खरे आहे.

महाराष्ट्र विज कंत्राटी कामगार संघ यांनी राज्य कामगार विमा योजनेमध्ये अंशदान राशीची मर्यादा रुपये २१,००० वरून रुपये ३०,००० करण्यात यावे अशी मागणी दिनांक २७/०५/२०२२ रोजी क्षेत्रिय कार्यालय, राज्य कामगार विमा महामंडळ, मुंबई यांचे कडे केली आहे.

(४) राज्य कामगार विमा योजनेकरीता पात्र होण्यास कमाल वेतन मर्यादा रुपये २१,००० वरून रुपये ३०,००० पर्यंत वाढविण्याची बाब धोरणात्मक असून याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार राज्य कामगार विमा महामंडळ मुख्यालय, नवी दिल्ली यांचे असल्याने "महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ" यांचे निवेदन दिनांक १३/०६/२०२२ अन्वये राज्य कामगार विमा महामंडळ मुख्यालयास पाठविण्यात आले असल्याचे क्षेत्रिय कार्यालय, राज्य कामगार विमा महामंडळ, मुंबई यांनी दिनांक २१/०६/२०२२ अन्वये कळविले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अमरावती विभागातील शाळा समग्र शिक्षा अनुदानापासून वंचित असल्याबाबत

**(११) १३९७५ (२५-०८-२०२२) श्री.नागोराव गाणार, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रवीण दटके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) समग्र शिक्षा अनुदानापासून शाळा वंचित असल्याचे दिनांक २२ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अमरावती विभागातील शाळांना सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन सेवा पी.एफ.एम.एस. या स्वयंचलित प्रणालीपासून देण्यात येणारे समग्र शिक्षा अनुदान मिळाले नसल्याने महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी व प्राथमिक शिक्षणाधिकारी अमरावती यांच्याकडे मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शाळांना अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (२२-११-२०२२) :** (१), (२) व (३) महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्यामार्फत समग्र शिक्षा, अमरावती यांना PFMS प्रणालीच्या माध्यमातून संयुक्त शाळा अनुदानापोटी प्राथमिकसाठी रुपये २,१४,२७,५००/- व माध्यमिकसाठी रुपये १६,४०,०००/- असे एकूण रुपये २,३०,६७,५००/- अनुदान तसेच गणवेशासाठी रुपये ७,२०,५२,२०० प्राप्त झाले आहेत. याबाबत महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांनी दिनांक २९/०४/२०२२ च्या पत्रांन्वये समग्र शिक्षा, अमरावती यांना कळविले आहे.
(४) बॅंक ऑफ महाराष्ट्र, मुंबई यांच्या स्तरावरील तांत्रिक अडचणींमुळे संयुक्त शाळा अनुदान व गणवेशासाठी दिले जाणारे अनुदान शाळांना उशीरा प्राप्त झाले आहे.

---

## कांरजा (जि.वाशिम) येथील टि.टि. सुपर बाजार गाळे विक्री करणाऱ्या मालकांवर कारवाई करण्याबाबत

**(१२) १४०८८ (३०-०६-२०२२) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कारंजा (जि.वाशिम) येथील टि.टि. सुपर बाजार पैकी २२ सभासदानी दुकानाची गाळे दिनांक १९ डिसेंबर, २०१९ ला खरेदी करण्याचा करार होवूनही सदर गाळे अपूर्ण बांधकाम करून गाळेधारकाची फसवणूक केल्याने यांची लेखी तक्रार गाळे खरेदीधारकांनी पो.स्टे. कारंजा येथे दिनांक १३ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त प्रकरणात फसवणूक करणाऱ्या टी.टी.सुपर बाजार गाळे विक्री करणाऱ्या मालकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) :** (१) कारंजा, जि.वाशिम येथील टी.टी. सुपर बाजार पैकी २२ सभासदांनी दुकानाची गाळे खरेदी करण्याचा करार होवूनही सदर गाळयाचे अर्धवट बांधकाम करुन गाळेधारकांच्या फसवणुकीबाबत ४ जणांविरुध्द दिनांक १६ मार्च २०२० रोजी पोलीस स्टेशन, कारंजा शहर येथे लेखी तक्रार केली आहे.
(२) तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, कारंजा शहर व त्यानंतर आर्थिक गुन्हे शाखा, वाशिम यांनी केलेल्या चौकशीअंती गाळे धारकांची फसवणूक झाल्याचे चौकशीत निष्पन्न झाल्याने पोलीस स्टेशन कारंजा शहर येथे अप क्र. ३५६/२०२२ भा.दं.वि कलम ४०६, ४२०, ४६८, ४६७, ३४. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा तपास सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शालेय क्रीडा स्पर्धेच्या मानधनात वाढ करणेबाबत

**(१३) १४४३४ (२५-०८-२०२२) श्री.बाळाराम पाटील, श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तालुका,जिल्हा,राज्यस्तरावर शालेय विद्यार्थ्यांमध्ये खिलाडू वृत्ती निर्माण करणेसाठी विविध शालेय क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या क्रीडा स्पर्धांसाठी देण्यात येणारे मानधन तालुक्यातील शाळांची संख्येचा व स्पर्धकांचा विचार करता हे अत्यंत कमी आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तालुका, जिल्हा व राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धांचे मानधन वाढविणे बाबत मागणी केली जात आहे हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने तालुका, जिल्हा व राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धांचे मानधन वाढविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (२३-११-२०२२) :** (१), (२), (३) आणि (४) शालेय क्रीडा स्पर्धा आयोजनामध्ये सहभागी घटकांच्या मानधनात वाढ करण्याची बाब तपासण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शाळांमध्ये कला, क्रिडा व कार्यानुभव शिक्षकांची नेमणूक करण्याबाबत

**(१४) १४६१० (२५-०८-२०२२) श्री.जयंत आसगावकर, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शाळांमध्ये कला,क्रिडा व कार्यानुभव शिक्षकांची पदे रिक्त असल्याचे माहे मे, २०२२ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षकांची नेमणूक केली नसल्याने राज्यातील शाळांमध्ये कला, क्रिडा व कार्यानुभव शिक्षकांच्या नेमणूका करण्याबाबत शिक्षक संघटनेकडून मागणी होत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिक्षकांच्याा मागणीची दखल घेऊन प्रत्येक शाळांमध्ये कला, क्रिडा व कार्यानुभव शिक्षकांची पदे तात्काळ भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (२३-११-२०२२) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) कला, क्रिडा व कार्यानुभव अंशकालीन शिक्षकांची नियुक्ती करण्याची बाब न्यायप्रविष्ट आहे.

---

## गटग्रामपंचायत घरतवाडा-गुजरखेडी (ता.काटोल, जि.नागपूर) येथे पंतप्रधान आवास योजनेंतर्गत घरकुल मंजूर करताना गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१५) १४९५४ (०८-०७-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गटग्रामपंचायत घरतवाडा-गुजरखेडी (ता.काटोल, जि.नागपूर) येथे सन २०१५ ते सन २०२१ या कालावधीत पंतप्रधान आवास योजनेंतर्गत घरकुल मंजूर करताना गैरव्यवहार झाल्याची तक्रार मुख्य कार्यपालन अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर व जिल्हा ग्रामीण विकास यांचेकडे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पक्की घरे असणाऱ्या तसेच मृत व्यक्तींना किंवा ज्यांच्याजवळ मालकीची जागा नाही अशा व्यक्तींना घरकुले मंजूर करण्यात आली असून घरकुलांचे बांधकाम न करता निधीमध्ये गैरव्यवहार झाला असल्याची बाब सदर तक्रारीत नमूद केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (२३-११-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सदर तक्रारीची चौकशी करण्यात आलेली असून, वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे :-

मृत व्यक्तींना किंवा स्वत:ची जागा नसलेल्या लाभार्थींना मंजूरी प्रदान करण्यात आली नाही.

१. श्री.उमराव चंपत बोंडे, २. श्री.पंजाब जागोजी राऊत, रा. घरतवाडा या लाभधारकांना प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात घरकुल मंजूर होते. सदर लाभधारक मृत्यू पावल्याने वारस १.पत्नी श्रीमती चंद्रभागा उमराव बोंडे, २. श्रीमती बेबीबाई पंजाब राऊत यांचे नावाने पंचायत समितीस्तरावरुन PFMS द्वारे घरकुलाचे अनुदान देण्यात आले असून घरकुलाचे बांधकाम पूर्ण झाले आहे. तसेच श्री.सुर्यभान मारोती बागडे या लाभधारकाला रमाई आवास योजना अंतर्गत सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात घरकुल मंजूर असून सदर लाभधारक मृत्यू पावल्याने वारस पत्नी श्रीमती यशोदा सुर्यभान बागडे यांचे नावाने पंचायत समितीस्तरावरुन PFMS प्रणालीद्वारे अनुदान देण्यात आले असून घरकुलाचे बांधकाम पूर्ण झाले आहे, व घरकुलामध्ये लाभार्थी वास्तव्य करीत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाराष्ट्र राज्यातील सर्व शाळांमध्ये मराठी भाषेचे अध्यापन व अध्ययन सक्तीचे करण्याबाबत

**(१६) १५०६७ (०७-१०-२०२२) श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामदास आंबटकर, ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक १२०४० ला दिनांक ८ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्यातील सर्व शाळांमध्ये मराठी भाषेचे अध्यापन व अध्ययन सक्तीचे करण्यासाठीचा कायदा माहे फेब्रुवारी, २०२० च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये पारित करण्यात आला आहे, हे खरे आहे काय?
(२) असल्यास, राज्यातील सर्व मंडळाच्या आयसीएसई, सीबीएसई, आंतराष्ट्रीय शाळांमध्ये इयत्ता पहिली ते दहावी पर्यंतच्या वर्गांना मराठी विषय अनिवार्य म्हणजे सक्तीचा करुन या नियमाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष सन २०२०-२१ पासून करण्यात येणार होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पहिल्या टप्प्यात पहिली व पाचवी करीता सदर कायद्याची अमलबजावणी करुन पुढील ५ वर्षात पहिली ते दहावीपर्यंतच्या सर्व इयत्तांमध्ये लागू करण्यात येणार होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शालेय शिक्षण विभागाकडून याबाबतची अंमलबजावणी करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (२४-११-२०२२) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) महाराष्ट्र राज्यातील सर्व शाळांमध्ये मराठी भाषेचे अध्यापन व अध्ययन सक्तीचे करण्यासाठी आणि तत्संबंधीत किंवा तदनुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरीता अधिनियम २०२० व शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, दिनांक १ जून, २०२० नुसार राज्यातील सर्व शाळांमध्ये मराठी भाषेचे अध्यापन व अध्ययन सक्तीचे करण्यासाठी सर्व परीक्षा मंडळांना कळविण्यात आले असून निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता नियमावली तयार करण्याची प्रक्रिया गठीत समितीमार्फत सुरू आहे.

सदर कायद्याची अंमलबजावणी सन २०२०-२१ पासून टप्प्याटप्प्याने सन २०२४-२५ पर्यंत करण्यात येणार आहे. याबाबतची नियमावली लवकरच अंतिम करण्यात येणार आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राजकीय क्षेत्रातील आरक्षण बंद करण्याच्या मागणीबाबत

**(१७) ३१९१६ (१९-०८-२०१७) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जाती-धर्माच्या आधारे होणाऱ्या शोषणाविरोधात बंड करुन धर्म आणि जाती व्यवस्थेविरोधात आव्हान उभे करीत संविधानात दलित आणि इतर मागासवर्गीय जातींना आरक्षण देऊन त्यांचे जीवनमान उंचावले परंतु आंबेडकरी संघटनांनी मुंबई विद्यापीठ, कलिना येथे एससी, एसटी, ओबीसी स्टुडंट्स व टीचर्स असोसिएशनच्या परिषदेत राजकीय क्षेत्रातील आरक्षण बंद करण्याची मागणी दिनांक १६ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नूसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (०२-१२-२०२२) :** (१) आणि (२) मुंबई विद्यापीठाच्या "कलिना कॅम्पस" मध्ये वेगवेगळे सभागृह आहेत. या सभागृहात विविध संघटनामार्फत त्यांचे कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. त्यामध्ये राजकीय क्षेत्रातील आरक्षण बंद केले पाहीजे, अशी मागणी माहे १६ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यादरम्यान आंबेडकर संघटनांनी, एस.सी., एस.टि., अथवा ओबीसी स्टूडंट्स व टिचर्स असोसिएशनच्या परिषदेमध्ये केली असल्याची शक्यता नाकारता येत नाही. तथापी याबाबतची माहिती विद्यापीठाच्या अभिलेखात आढळून येत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील अनेक शासन मान्य रक्तपेढ्यांमध्ये रक्त संक्रमण अधिकारी पदावर कर्मचारी नियुक्त करण्याबाबत

**(१८) ४०२१३ (०४-०४-२०१८) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनेक शासनमान्य रक्तपेढीमध्ये रक्त संक्रमण अधिकारी या पदावर कर्मचारी नियुक्त नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासन मान्य रक्तपेढीमध्ये रक्त संक्रमण अधिकारी पदावर कर्मचारी नियुक्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (०२-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही,

शासन मान्य रक्तकेंद्रामध्ये ३४ मंजूर पदांपैकी २७ पदे भरलेली आहेत.

(२) व (३) रिक्त पदे वेळोवेळी बदली, प्रतिनियुक्ती तसेच नियुक्तीने भरण्यात येतात. तसेच रक्तकेंद्रातील कामावर परिणाम होऊ नये म्हणून इतर वैद्यकीय अधिकाऱ्यांना अतिरिक्त पदभार दिला जातो.

---

## राज्यात अल्पसंख्यांक पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण योजनेंतर्गत युवक-युवतीना निवासी प्रशिक्षण देण्याबाबत

**(१९) ४७७२० (१०-०७-२०१९) डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अल्पसंख्यांक पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण योजनेंतर्गत युवक-युवतींना निवासी प्रशिक्षण देण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार निवासी प्रशिक्षण देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच प्रशिक्षणाचा गत ४ वर्षापासून जिल्हानिहाय तपशील काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड (०१-११-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) राज्यातील अल्पसंख्याक समाजातील युवक-युवतींच्या पोलीस भरतीतील प्रमाणात वाढ व्हावी याकरीता शासन निर्णय दिनांक १७ डिसेंबर, २०२१ अन्वये निवासी पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण योजना सुरु करण्यात आलेली आहे. सदर योजनेनुसार सन २०२२-२३ या वर्षापासून निवासी पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण देण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. तसेच, शासन निर्णय २७/०७/२००९ अन्वये राबविण्यात आलेल्या पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण योजनेंतर्गत राबविण्यात आलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमाचा मागील ४ वर्षाचा जिल्हानिहाय तपशील खालीलप्रमाणेः

सन-२०१८-१९

| अ.क्र. | जिल्हा | उमेदवारांची संख्या | अ.क्र. | जिल्हा | उमेदवारांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | लातूर | ४० | ११ | चंद्रपूर | १०० |
| २ | अमरावती | ७१ | १२ | नागपूर | १०० |
| ३ | गडचिरोली | २८ | १३ | अकोला | १०० |
| ४ | हिंगोली | ९१ | १४ | वर्धा | ९३ |
| ५ | यवतमाळ | ५२ | १५ | सातारा | २५ |
| ६ | बीड | ४७ | १६ | सांगली | १० |
| ७ | नांदेड | ७३ | १७ | परभणी | ४० |
| ८ | औरंगाबाद | १०० | | | |
| ९ | जालना | १०० | | | |
| १० | जळगाव | १०० | | | |

सन-२०१९-२०

विहीत मुदतीत प्रस्ताव प्राप्त न झाल्यामुळे तसेच सन-२०१९-२० वर्ष संपुष्टात आल्यामुळे सदर योजना सन-२०१९-२० या वर्षात राबविण्यात आलेली नाही.

सन- २०२०-२१

सन २०२०-२१ मध्ये खालील जिल्ह्यांना प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यास मान्यता देण्यात आलेली होती.

| अ.क्र. | जिल्हा | उमेदवारांची संख्या | अ.क्र. | जिल्हा | उमेदवारांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १. | अमरावती | १०० | १२. | पुणे | १०० |
| २. | गडचिरोली | १०० | १३. | जालना | १०० |
| ३. | बीड | १०० | १४. | औरंगाबाद | १०० |
| ४. | नांदेड | १०० | १५. | नंदुरबार | १०० |
| ५. | अकोला | १०० | १६. | सांगली | १०० |
| ६. | वर्धा | १०० | १७. | सिंधुदुर्ग | १०० |
| ७. | नाशिक | १०० | १८. | नागपूर | १०० |
| ८. | बुलढाणा | १०० | १९. | हिंगोली | १०० |
| ९. | सोलापूर | १०० | | | |
| १०. | यवतमाळ | १०० | | | |
| ११. | परभणी | १०० | | | |

सन-२०२०-२१

या वर्षात कोविड -१९ विषाणू संसर्गामुळे लावण्यात आलेली टाळेबंदी व निर्बंध याचे काटेकोरपणे पालन करुन सदर प्रशिक्षण कार्यक्रम चालू करण्याचे जिल्हाधिकारी यांना निर्देश देण्यात आलेले होते. उपरोक्त जिल्ह्यांपैकी औरंगाबाद, हिंगोली, नांदेड, अकोला, परभणी, बीड, वर्धा या जिल्ह्यातील प्रशिक्षण संस्थांनीच सदर प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण केलेला आहे.

सन- २०२१-२२

या वर्षी कोरोना विषाणू संसर्गाच्या तिसऱ्या लाटेमुळे लागू करण्यात आलेले निर्बंधांमुळे सदर प्रशिक्षण योजना राबविण्यात आलेली नाही.

सन-२०२२-२३

निवासी पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण योजनेनुसार प्रशिक्षण संस्थांची निवड करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## इयत्ता ११ वीच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचे काम सुरळीतपणे होण्याबाबत

**(२०) ४९३३२ (२९-०८-२०१९) श्री.विलास पोतनीस : तारांकित प्रश्न क्रमांक ४४७४२ ला दिनांक २० नोव्हेंबर, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इयत्ता ११ वी च्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेच्या मंद गतीमुळे विद्यार्थी व पालकांची गैरसोय झाल्याचे माहे ऑगस्ट, २०१९ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार भविष्यात इयत्ता ११ वीची ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया जलदगतीने पार पाडण्यासाठी तसेच अधिक सक्षम करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (२४-११-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) इयत्ता ११ ची ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमध्ये सुसुत्रता आणण्यासाठी व प्रक्रिया गतिमान करण्यासाठी वेळोवेळी शासन निर्णय निर्गमित करण्यात येऊन त्यानुसार प्रवेश प्रक्रिया पार पाडण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**
**नागपूर.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.